महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ २६ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २११ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### संविधान, लोकशाही आणि जबाबदारी!

आज भारत आपला ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहे. २६ जानेवारी हा दिवस भारताने स्वतःला लोकशाही, सार्वभौम आणि संविधानाधिष्ठित राष्ट्र म्हणून जगासमोर मांडलेला दिवस आहे. मात्र प्रश्न असा आहे की, आपण हा दिवस साजरा करतोय की त्याचा अर्थही जपत आहोत? संविधानाने दिलेले स्वातंत्र्य, समानता आणि न्याय हे शब्द आजही भाषणांत ऐकू येतात; पण प्रत्यक्षात त्यांचे पालन किती होते, हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे. कायदा सर्वांसाठी समान असावा, ही संविधानाची मूळ भावना आहे. मात्र सत्तेची ताकद, पैशांचे बळ आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे कायद्याचा तराजू अनेकदा वाकलेला दिसतो. लोकशाही केवळ मतदानाच्या दिवशी आठवणारा सण बनू नये. मत देऊन मोकळे होणे म्हणजे नागरिकत्वाची जबाबदारी संपत नाही. प्रश्न विचारणे, चुकीला विरोध करणे आणि संविधानिक मार्गाने बदल घडवून आणणे, हेच लोकशाहीचे खरे लक्षण आहे. आज मात्र प्रश्न विचारणाऱ्यांनाच संशयाच्या नजरेने पाहिले जाते, ही बाब गंभीर आहे.

२६ जानेवारी हा दिवस केवळ ध्वजारोहण, संचलन किंवा उत्सवापुरता मर्यादित नसून, तो भारतीय लोकशाहीच्या पायाचा आणि संविधानाच्या अंमलबजावणीचा ऐतिहासिक क्षण आहे. १९५० साली याच दिवशी भारताने स्वतःचे संविधान स्वीकारले आणि एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष व लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्वतःची ओळख जगासमोर मांडली. राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत आणि राष्ट्रीय सणांचा सन्मान हा केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित राहू नये. एकीकडे ध्वजारोहण आणि दुसरीकडे त्याच ध्वजाचा अवमान—ही विसंगती राष्ट्र म्हणून आपल्याला शोभणारी नाही.

देशप्रेम हे घोषणा आणि प्रतीकांपुरते नसून, जबाबदार वर्तनातूनच ते सिद्ध होत असते. ७७ वर्षांनंतरही जर आपल्याला सामाजिक विषमता, अन्याय, भ्रष्टाचार आणि असंवेदनशीलता यांच्याशी लढावे लागत असेल, तर आत्मपरीक्षणाची गरज आहे. संविधान ही केवळ ग्रंथाची पाने नसून, ती रोजच्या जीवनात उतरवायची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे. हा प्रजासत्ताक दिन आपल्याला एक प्रश्न विचारायला भाग पाडतो—आपण संविधानाचा सन्मान फक्त सणांपुरता ठेवणार आहोत, की त्याचे मूल्य रोजच्या जगण्यात उतरवणार आहोत? उत्तर आपल्या कृतीतूनच द्यावे लागेल.

# प्रजासत्ताक दिनी देशातील 982 जणांचा सन्मान

## महाराष्ट्रातील 89 अधिकारी-कर्मचाऱ्यांना शौर्य व सेवा पदके जाहीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**नवी दिल्ली, 25 :**

नवी दिल्ली : प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारकडून देशातील 2026 च्या पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. देशातील सर्वोच्च पुरस्कार मानले जाणाऱ्या पद्म पुरस्कारांची घोषणा झाली असून महाराष्ट्रातील अनेकांना पद्म पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. त्यामध्ये, लोकनाट्य क्षेत्रात तमाशा कलाकार रघुवीर खेडकर आणि कृषि क्षेत्रातील योगदानाबद्दल श्रीरंग लाड यांना यंदाच्या वर्षीचे पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत. यांसह पालघरमधील वारली संगीतकार भिकल्या लाडक्या ढिंका आणि आर्मिंदा फर्नांडीस यांनाही पद्म पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. केंद्र सरकारने 45 मान्यवरांची पद्म पुरस्कारासाठी निवड केली असून प्रजासत्ता दिनाच्या पूर्वसंध्येला सर्व सन्मानितांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. त्यामध्ये, महाराष्ट्रातील 4 भूमीपुत्रांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. त्यामध्ये, लोकनाट्य कलाकार रघुवीर खेडकर यांचाही समावेश आहे. लोककला, लोकनाट्य जपण्यात त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा सन्मान होत आहे. दरम्यान, सन 2005 मध्ये महाराष्ट्र शासनाने तमाशा क्षेत्रातील योगदानासाठीचा रघुवीर खेडकर यांच्या मातोश्री विठाबाई नारायणगावकर यांना पहिला जीवन गौरव पुरस्कार देऊन कांताबाईंचा सन्मान केला आहे. दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धाप्रसंगी कांताबाई आणि रघुवीर यांना तमाशा सदर करण्याचा बहुमान मिळाला होता.

**■ महाराष्ट्रातील 4 जणांचा गौरव**

**रघुवीर खेडकर**
**भिकल्या लडक्या धिंडा**
**श्रिरंग देवबा लाड**
**आर्मिंदा फर्नांडीस**

### ● पद्म पुरस्काराने सन्मानित नावे ●

- भगवंदास रायकर (मध्य प्रदेश)
- ब्रिज लाल भट्ट (जम्मू-कश्मीर)
- चरण हेम्ब्रम (ओडिशा)
- चिरंजी लाल यादव (उत्तर प्रदेश)
- डॉ. पद्मा गुरमेट (जम्मू-कश्मीर)
- कोल्लक्कयिल देवकी अम्मा जी (केरल)
- महेंद्र कुमार मिश्रा (ओडिशा)
- नरेश चंद्र देव वर्मा (त्रिपुरा)
- ओथूवर तिरुथानी (तमिलनाडु)
- रघुपत सिंह (उत्तर प्रदेश)
- राजस्तापति कालीअप्पा गौंडर (तमिलनाडु)
- सांग्युसांग एस. पोंगेनर (नागालैंड)
- थिरुवरूर बख्तवसलम (तमिलनाडु)
- अंके गौड़ा (कर्नाटक)
- डॉ. श्याम सुंदर (उत्तर प्रदेश)
- गफरुद्दीन मेवर्ती (राजस्थान)
- खेम राज सुंद्रीयाल (हरियाणा)
- मीर हाजीभाई कसामभाई (गुजरात)
- मोहन नगर (मध्य प्रदेश)
- नीलेश मंडलेवाला (गुजरात)
- आर एंड एस गोडबोले (छत्तीसगढ़)
- राम रेड्डी ममिडी (तेलंगाना)
- सिमांचल पात्रो (ओडिशा)
- सुरेश हनागवाड़ी (कर्नाटक)
- तेची गूबिन (अरुणाचल प्रदेश)
- युनम जत्रा सिंह (मणिपुर)
- बुधरी ताथी (छत्तीसगढ़)
- डॉ. कुमारासामी थंगाराज
- डॉ. पुण्णियामूर्ति नटेसन
- हैली वॉर (मेघालय)
- इंदरजीत सिंह सिद्धू (चंडीगढ़)
- के. पाजनिवेल (पुडुचेरी)
- कैलाश चंद्र पंत (मध्य प्रदेश)
- नुरुद्दीन अहमद (असम)
- पोकीला लेकटेपी (असम)
- आर. कृष्णन (तमिलनाडु)
- एस. जी. सुशीलेम्मा (कर्नाटक)
- टागा राम भील (राजस्थान)
- विश्व बंधु (बिहार)
- धर्मिकलाल पांड्या (गुजरात)
- शफी शौक़ (जम्मू-कश्मीर)

या सर्वांना पद्म पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून महाराष्ट्रातील 4 भूमिपुत्रांचा पद्म पुरस्काराने गौरव झाला आहे. शेती, वैद्यकीय आणि लोककला यांसोबतच आदिवास संस्कृतीचा श्वास असलेल्या वारली संगीतालाही यंदा सन्मान मिळाला आहे. पालघर जिल्ह्यातील जव्ह ताालुक्यातील अतिदुर्गम वाळवंडा गावचे सुपुत्र आणि ज्येष्ठ तारपा वादक भिकल्या लाडक्या धिंडा यांन 'पद्मश्री' पुरस्कार जाहीर झाला आहे.



# ठाणे, कल्याण उल्हासनगरमध्ये भाजपा कार्यकर्त्यांची परवड झाली - वनमंत्री गणेश नाईक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**ठाणे :** ठाणे, कल्याण डोंबिवलीत भारतीय जनता पक्षाच्या घोड्यांचे लगाम खेचले गेले. शेवटी जे व्हायचं असत ते होत आणि शेवटी भारतीय जनता पक्ष हा शिस्तीचा पक्ष आहे. एकदा आदेश आला की, तो पाळला जातो. कोणाच्या मनात इच्छा असो वा नसो. त्यामुळे ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगरमध्ये भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांची परवड झाली. तरी सुद्धा कार्यकर्त्यांनी शिस्त पाळली हे महत्त्वाचे आहे, असे वक्तव्य वनमंत्री गणेश नाईक यांनी ठाण्यात बोलताना केले. ठाण्यातील वंदे मातरम संघ आयोजित माघी गणेश जन्मोत्सव गणपतीच्या दर्शनासाठी वनमंत्री गणेश नाईक आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते पुढे म्हणाले, नेत्याला जशी खासदारकी आमदारकी मिळते तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत कार्यकर्त्यांना संधी मिळावी यासाठी माझी इच्छा होती की, ठाणे जिल्ह्यासह एमएमआरडीए परिसरामध्ये सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांना लढू द्या. लढल्यानंतर मग पुन्हा ज्याचे नगरसेवक जास्त त्याचा महापौर त्याला सगळयांनी म्हणजे दुसऱ्या मित्रपक्षाने पाठिंबा द्यायचा. त्यानुसार दुसरी पद वाटून घ्यायची यासंदर्भात मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना देखील बोललो होतो. त्यांनी यावर होकार ही दिला नव्हता किंवा नकार ही दिला नव्हता. आम्ही अपेक्षा करत होतो की कार्यकर्त्यांना आपली करामत करण्यासाठी संधी मिळेल. काही ठिकाणी दुर्दैवाने संधी मिळाली नाही तर काही ठिकाणी परिस्थितीमुळे ती संधी निर्माण झाली, असे नाईक म्हणाले.




## महत्वाचे

# अंतर्गत कुरघोडी आणि अपक्षांना मूक साथ

### उल्हासनगरमध्ये भाजप–शिंदे शिवसेनेचे बहुमत हुकले

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिकेची निवडणूक जिंकण्यासाठी भाजप आणि शिंदे शिवसेनेने संपूर्ण ताकद पणाला लावली होती. निकालानंतरही हे दोन्ही पक्ष सत्तेच्या अत्यंत जवळ पोहोचले होते; मात्र बहुमताचा 'जादुई आकडा' गाठण्यात ते अपयशी ठरले. या अपयशामागे विरोधकांची रणनीतीपेक्षा पक्षांतर्गत कुरघोडी, उमेदवारांची गद्दारी, एबी फॉर्मचा गोंधळ आणि काही ठिकाणी अपक्ष उमेदवारांना मिळालेली मूक साथ ही कारणे अधिक निर्णायक ठरल्याचे चित्र समोर येत आहे. उल्हासनगर महापालिका निवडणुकीत भाजप आणि शिंदे शिवसेनेला सर्वाधिक जागा मिळाल्या असल्या, तरी दोन्ही पक्ष बहुमतापासून दूरच राहिले. निकालानंतर झालेल्या अंतर्गत चर्चा आणि प्रभागनिहाय विश्लेषणातून हे स्पष्ट झाले आहे की, या अपयशामागे जनतेचा रोष किंवा विरोधकांची ताकद नव्हे, तर स्वतःच्या उमेदवारांकडून झालेल्या गंभीर राजकीय चुकांचा मोठा फटका बसला आहे. शिंदे शिवसेनेच्या बाबतीत प्रभाग क्रमांक १० मधील घडामोडी पक्षासाठी मोठा धक्का ठरल्या. येथे शिवसेनेच्या चार उमेदवारांपैकी तीन उमेदवारांनी पक्षाच्या अधिकृत महिला उमेदवाराचा प्रचार न करता थेट एका अपक्ष महिला उमेदवाराच्या बाजूने प्रचार केल्याचे समोर आले. परिणामी, शिवसेनेची अधिकृत महिला उमेदवार पराभूत झाली, तर अपक्ष उमेदवारालाही विजय मिळवता आला नाही. या अंतर्गत फूटीमुळे शिवसेनेची एक निश्चित जागा हातातून गेली.

याहून अधिक गंभीर प्रकार प्रभाग क्रमांक २० मध्ये घडल्याचे समोर आले आहे. शिंदे गटाच्या एका उमेदवाराने आपल्या पॅनलमधील दोन अधिकृत उमेदवारांचा प्रचार पूर्णपणे टाळत दोन अपक्ष उमेदवारांसोबत खुलेआम पत्रक छापून प्रचार केल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे मतांचे मोठ्या प्रमाणावर विभाजन झाले. त्याचा थेट परिणाम असा झाला की, शिंदे गटाला प्रभाग क्रमांक १९ आणि २० मिळून तब्बल ६ जागा गमवाव्या लागल्या. बहुमताच्या शर्यतीत ही चूक निर्णायक ठरल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# कल्याण पूर्वेत ठाकरे गटातील बेपत्ता नगरसेवकांचे पोस्टर



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणूकीत उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या मशाल चिन्हावर तब्बल ११उमेदवार निवडून आले यात आता पर्यंत चार नगरसेवक 16 तारखेपासून नॉट-रिचेबल आहेत. या बेपत्ता नगरसेवकांची माहिती मिळावी यासाठी कल्याण पूर्वेत ठाकरे गटाच्या पदाधीकार्यानी पोस्टरबाजी केली आहे.

मधुर म्हात्रे, कीर्ती ढोणे, राहुल कोट आणि स्वप्नील केणे अशी बेपत्ता नगरसेवकांची नावे असून राजकीय घाडामोडी पार्श्वभूमीवर भाजपा ५०, शिवसेना शिंदेगट ५३, काँग्रेस २, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट १, मनसे ५ आणि उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्ष ११ असे पक्षीय बळाबळ असून सत्तासुदंरीच्या खुर्ची साठी राजकीय गणिते, राजकीय समीकरण, राजकीय घाडामोडी नाट्य पाहता या नॅाट रिचेबल नगरसेवकांची भुमिका काय ? हे ते समोर आल्यानंतर नेमके कळेल पंरतु या बेपत्ता नगरसेवक प्रकरणी उबाठा गटाने नगरसेवकांचा शोध घ्यावा यासाठी पदाधिकाऱ्यांनी कोळशेवाडी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी पोस्टर लावून नगरसेवकांचा शोध घेण्याचा आदेश दिल्याने कल्याण पूर्वेतील सार्वजनिक भिंतीवर पोस्टर चिटकवून बेपत्ता नगरसेवक आढळल्यास कोळसेवाडी शिवसेना शाखेत माहिती द्यावी अशी पोस्टरबाजी करीत मागणी केल्याने राजकीय घडामोडीत चांगलीच रंगत आली असल्याचे चित्र दिसत आहे.

# डोंबिवलीत भीषण आग

### बंद घर जळून खाक, सुदैवाने जीवितहानी टळली

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ■ प्रतिनिधी / दि. २५**

**डोंबिवली :** येथील पूर्व भागातील गजबजलेल्या संत नामदेव पथावर रविवारी (दि. २५) दुपारी भीषण आगीची घटना घडली. 'लक्ष्मीनारायण' इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील एका घराला अचानक आग लागून घरातील सर्व संसार जळून खाक झाला. सुदैवाने, आग लागली तेव्हा घरात कोणीही नसल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, या दुर्घटनेत घरमालकाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी अडीचच्या सुमारास घरमालक चंद्रशेखर बागायतदार हे आपल्या घराला कुलूप लावून काही कामानिमित्त बाहेर पडले होते. ते गेल्यानंतर अवघ्या काही मिनिटांतच बंद घरातून धुराचे लोट बाहेर येऊ लागले. पाहता पाहता आगीने रौद्र रूप धारण केल्याने इमारतीमधील रहिवाशांमध्ये घबराट पसरली.



*जावक क्रमांक : मावज/विमाका/कोवि/प्रजासत्ताक दिन/472

## वाचक मनोगत

### राष्ट्रध्वजाचा सन्मान अबाधित राखूया

प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा ठाण्यातील साकेत मैदानावर होणार असून हा सोहळा उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडणार आहे. यासह जिल्ह्यात विविध ठिकाणी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

दरम्यान, प्रजासत्ताक दिनाचा उत्सव साजरा करताना राष्ट्रध्वजाचा सन्मान अबाधित राहील, याची काळजी घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे. ध्वजारोहणानंतर राष्ट्रध्वज कुठेही टाकून न देता तो कापडी पिशवीत नीट बांधून संबंधित तहसील कार्यालयात जमा करण्याच्या मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उद्या सोमवारी २६ जानेवारी रोजी साजरा होणार आहे. या निमित्ताने देशभरात तसेच राज्यात ध्वजारोहण, देशभक्तीपर व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातील सर्व शाळांमध्ये एकाच वेळी सामूहिक कवायतींचे आयोजन करण्यात येणार असून ठाणे जिल्ह्यातील शाळाही या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

याशिवाय शाळा व महाविद्यालयांमध्ये कवायती, एनसीसी परेड यांचे आयोजन करण्यात आले असून विद्यार्थी त्यासाठी तयारी करत आहेत. जिल्ह्यातील सर्व महापालिका व नगरपालिकांमध्येही प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचे कार्यक्रम होणार आहेत. प्रशासनाकडून नागरिकांनी उत्सव साजरा करताना राष्ट्रध्वजाच्या सन्मानास प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमांना मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. कार्यक्रम शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावेत, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या असून सुरक्षा व्यवस्थेवरही विशेष लक्ष देण्यात येत आहे. नागरिकांनी, शाळा–महाविद्यालये तसेच सामाजिक संस्थांनी उत्सव साजरा करताना नियमांचे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. राष्ट्रध्वजाचा सन्मान राखत आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना जपत प्रजासत्ताक दिन साजरा करावा, असे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात शहिदांनी दिलेल्या बलिदानाचे आणि स्वातंत्र्यसैनिकांनी सोसलेल्या हालअपेष्टांचे प्रतीक म्हणजे राष्ट्रध्वज होय. देशाच्या स्वातंत्र्याचे, एकतेचे आणि सार्वभौमत्वाचे प्रतीक असलेला राष्ट्रध्वज जाती, धर्म व पंथांच्या पलीकडे जाऊन सर्व भारतीयांना एकत्र बांधतो. मात्र १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीसारख्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी कागदी व प्लास्टिकचे राष्ट्रध्वज रस्त्यावर पडलेले दिसणे ही चिंतेची बाब असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. राष्ट्रध्वजासाठी अनेकांनी आपले प्राण अर्पण केले असून, तोच ध्वज अवमानित अवस्थेत दिसल्याने संवेदनशील नागरिकांच्या भावना दुखावल्या जात आहेत. त्यामुळे प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्याबाबत जनजागृती करणे आणि प्रत्येक नागरिकाने तो जपण्याची जबाबदारी स्वीकारणे गरजेचे असल्याचे माझं वैयक्तीक मत आहे.

शहिदांनी दिलेल्या बलिदानाचे आणि स्वातंत्र्यसैनिकांनी सोसलेल्या हालअपेष्टांचे प्रतीक म्हणजे राष्ट्रध्वज होय. देशाच्या स्वातंत्र्याचे, एकतेचे आणि सार्वभौमत्वाचे प्रतीक असलेला राष्ट्रध्वज जाती, धर्म व पंथांच्या पलीकडे जाऊन सर्व भारतीयांना एकत्र बांधतो. मात्र १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीसारख्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी कागदी व प्लास्टिकचे राष्ट्रध्वज रस्त्यावर पडलेले दिसणे ही चिंतेची बाब आहे.

**राहूल विलास भोईर**
**चिकणघर कल्याण**

# लोकशाहीच्या बळकटीकरणात मतदारांचा सहभाग महत्त्वाचा -जिल्हाधिकारी किशन जावळे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**रायगड-अलिबाग,दि.25**

लोकशाही बळकटीकरणात मतदारांचा सहभाग महत्त्वाचा असून मतदारांनी मतदानाचा अधिकार बजावणे आवश्यक आहे. नवं मतदारांनी अन्य युवकांना तसेच दिव्यांग व्यक्तींना मतदार नोंदणी आणि मतदानासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात 16 व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसीलदार विक्रम पाटील, जे.एस.एम. कॉलेजच्या प्राचार्य सोनाली पाटील, महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष दिव्यांग आयकॉन साईनाथ पवार, युथ आयकॉन तपस्वी गोंधळी आदी उपस्थित होते.



### राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त निवडणुकीत उत्कृष्ट काम केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान

लोकशाही बळकट करण्यासाठी योगदान देणाऱ्या पुरस्कारार्थ्यांचे अभिनंदन करून जिल्हाधिकारी म्हणाले, मतदार यादी हे मतदान प्रक्रीयेचा आत्मा आहे. मतदान प्रक्रीया ही लोकशाहीचा आत्मा आहे. नवमतदारांना मतदान प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे, त्यांची मतदार म्हणून नोंदणी व्हावी, हा राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यामागील उद्देश आहे. मतदार यादी सर्वसमावेशक व्हावी यासाठी जिल्हा निवडणूक प्रशासनाने विशेष प्रयत्न केले. महिला, दिव्यांग, आदिवासी, कामगार आणि दुर्गम भागातील नागरिकांच्या मतदार नोंदणीसाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. युवकांची नोंदणी करून त्यांचा मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग वाढावा यासाठी प्रबोधन करणे आवश्यक आहे. ज्यां नवमतदार यांनी मताधिकार बजावला आहे त्यांनी हे जनजागृती करावी. तसेच मतदार नोंदणीसाठी युवक व युवतींनी प्रोत्साहित करावे असे आवाहन जिल्हाधिकारी श्री.जावळे यांनी यावेळी केले.

प्रास्ताविक करताना उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे यांनी मतदार दिन कार्यक्रमाची माहिती दिली. भारत निवडणूक आयोगाची स्थापना 25 जानेवारी 1950 रोजी झाल्याने 2011 पासून मतदार जागृतीसाठी हा दिवस साजरा केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा प्रशासनातर्फे आयोजित विविध उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली.

कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन तहसिलदार विक्रम पाटील यांनी मानले.

**उत्कृष्ट कामगिरीसाठी अधिकारी व कर्मचारी सत्कार**

**उत्कृष्ट मतदार नोंदणी अधिकारी, प्रविण पवार, उत्कृष्ट वृत्तपत्र दैनिक रायगड टाईम्सचे संपादक राजन वेलकर, उत्कृष्ट समन्वय अधिकारी,समन्वय अधिकारी मतदान यंत्र व्यवस्थापन, टपाली मतदान व मतमोजणी, समन्वय अधिकारी निवडणूक खर्च नियंत्रण समिती तसेच इतर विभागातील मतदार नोंदणी अधिकारी/सहायक मतदार नोंदणी अधिकारी/निवडणुक नायब तहसिलदार/महसूल सहायक अधिकारी/महसूल सहायक/शिपाई/डाटा एंन्ट्री ऑपरेटर/मतदान केंद्रस्तरीय अधिकारी/महाविद्यालय या अधिकारी व कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.**



# अंतरंग फाऊंडेशननं लावली हजारो विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शनाची दीपमाळ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** करिअरच्या वाटेवर उभ्या असलेल्या किशोरवयीन मनांमध्ये संभ्रम असतो, प्रश्न असतात, भीती असते... पण योग्य शब्द, योग्य दिशा आणि योग्य मार्गदर्शन मिळालं की तीच मनं स्वप्नांकडे झेप घेऊ लागतात. ठाणे जिल्ह्यात हेच घडलं. कल्याण-डोंबिवली, ठाणे, मीरा-भाईंदर, भिवंडी-निजामपूर आणि नवी मुंबई या महानगरपालिकांच्या सहकार्याने अंतरंग फाऊंडेशनने राबवलेली तीन भागांची ऑनलाइन करिअर वेबिनार मालिका म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यात उजेडाची दीपमाळ ठरली.

५५ हून अधिक शाळांमधील इयत्ता ८वी, ९वी आणि १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या उपक्रमाने केवळ माहिती दिली नाही, तर विचारांना दिशा दिली, मनाला बळ दिलं आणि स्वप्नांना पंख दिले. “करिअर म्हणजे फक्त नोकरी नाही, तो स्वतःला घडवण्याचा प्रवास आहे” ही भावना या वेबिनार मालिकेच्या प्रत्येक संवादातून विद्यार्थ्यांच्या मनात रुजली. शिक्षण, IT, AI आणि सोशल सेक्टरसारख्या विविध क्षेत्रांतील अनुभवी वक्त्यांनी विद्यार्थ्यांसमोर आपले अनुभव उघडले—संघर्षांचे दिवस, अपयशांचे क्षण, यशाची पहिली पायरी आणि त्या प्रवासातून शहाणपणाची शिदोरी मिळाली. शब्दांतून फक्त कथा नव्हत्या, तर आयुष्याची शिकवण होती; सल्ल्यांत फक्त मार्ग नव्हता, तर आत्मविश्वासाची ज्योत होती. त्यामुळे करिअर ही संकल्पना विद्यार्थ्यांसाठी पुस्तकातली माहिती न राहता, जिवंत अनुभव बनून उभी राहिली.

प्रश्नोत्तर सत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी भीती झटकली, संकोच बाजूला ठेवला आणि मनातले प्रश्न मोकळेपणाने विचारले. विचार करण्याची सवय, प्रश्न विचारण्याची हिंमत आणि स्वतःचं मत ठामपणे मांडण्याचं धाडस या उपक्रमातून नकळत त्यांच्या व्यक्तिमत्त्वात रुजत गेलं. अनेक विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत पहिल्यांदाच “मी करू शकतो” हा विश्वास चमकताना दिसला. ऑनलाइन स्वरूपामुळे हा उपक्रम केवळ काही शाळांपुरता मर्यादित राहिला नाही. वर्गखोल्यांतील टीव्ही, प्रोजेक्टर, मोबाईलच्या स्क्रीनवरून एकाच वेळी हजारो विद्यार्थी या वेबिनारशी जोडले गेले. शहर, उपनगर, परिसर यांची सीमा मिटली आणि करिअर मार्गदर्शनाचा प्रकाश ठाणे जिल्ह्याच्या कोपऱ्या-कोपऱ्यात पोहोचला.

या यशामागे शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, समन्वयक आणि महानगरपालिकांचे भक्कम पाठबळ होते. त्यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम केवळ कार्यक्रम न राहता, चळवळ बनला. अंतरंग फाऊंडेशनने या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शनाची नवी संस्कृती रुजवली असून, भविष्यात अधिक व्यापक, अधिक समावेशक आणि अधिक प्रभावी उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देण्याचा संस्थेचा निर्धार या यशस्वी वेबिनार मालिकेतून ठामपणे अधोरेखित झाला आहे.

# 'माझा भारत, माझं मत, मी भारत आहे'
## ठाण्यात 16 वा राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**ठाणे :** लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी आणि मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आज ठाणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने '१६ वा राष्ट्रीय मतदार दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. "माझा भारत, माझे मत, मी भारत आहे" या मुख्य संकल्पनेवर आधारित हा मुख्य शासकीय कार्यक्रम जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सर्जेराव मस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी(रोहयो) शशिकांत गायकवाड, उपजिल्हाधिकारी (मेट्रो सेंटर) वरुणकुमार सहारे, ठाणे प्रांताधिकारी उर्मिला पाटील, तहसिलदार सचिन चौधर, संदीप थोरात, राजेंद्र चव्हाण, प्रदीप कुडाळ, नायब तहसिलदार स्मितल यादव, निवडणूक दूत नीता केणे (किन्नर अस्मिता), अपंग विकास महासंघाचे अध्यक्ष अशोक भोईर, ठाणे सिटीजन फाऊंडेशनचे अध्यक्ष कॅस्बर ऑगस्टीन यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालय व निवडणूक शाखेतील इतर अधिकारी-कर्मचारी आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्यासह उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त प्रतिज्ञा घेतली

**लोकशाहीत मतदारांचे स्थान सर्वोच्च..**
**-जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ**

"भारतीय संविधानाने आपल्याला मतदानाचा अत्यंत महत्त्वाचा अधिकार दिला आहे. ठाणे जिल्हा हा राज्यातील सर्वाधिक मतदार संख्या असलेला जिल्हा असून, १८ विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक पात्र मतदाराने नोंदणी करणे आणि मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे. सध्या राबविल्या जाणाऱ्या 'एसआर' (मतदार पुनरिक्षण) कार्यक्रमांतर्गत जास्तीत जास्त युवकांनी आपली नावे नोंदवावीत. कलाकारांच्या माध्यमातून होणारी जनजागृती ही अधिक प्रभावी ठरते, म्हणूनच आज सिनेसृष्टीतील मान्यवर या मोहिमेत सहभागी झाले आहेत." ते म्हणाले, लोकशाही म्हणून आपल्या देशातील स्थिरता वादातीत आहे. संपूर्ण जगासमोर भारतीय लोकशाही एक सुदृढ लोकशाही म्हणून आदर्श आहे. संविधानाने लोकशाहीच्या माध्यमातून भारत देशातील प्रत्येक घटकाला अधिकाररुपी बळ दिले आहे. भारतात सर्वोच्च कुणीही नाही, सर्वोच्च आहे ती फक्त लोकशाही. ● **जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ**



## वसंत पंचमीनिमित्त
# कल्याणी दुर्गा माता मंदिरात विविध उपक्रम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**कल्याण :** कल्याण पूर्व येथील कल्याणी दुर्गा माता मंदिरात वसंत पंचमीच्या निमित्ताने विद्येची देवी माँ सरस्वतीची पूजा-अर्चा श्रद्धा व उत्साहात करण्यात आली. मिथिलाजन एज्युकेशनल सोशल अँड रिलिजियस ट्रस्टच्या वतीने दरवर्षीप्रमाणे कल्याणी दुर्गा माता मंदिरात अखंड हरिनाम कीर्तन, सरस्वती पूजन, हवन तसेच भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. चार दिवस चाललेल्या विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

वसंत पंचमीच्या खास प्रसंगी मिथिलाजन ट्रस्टच्या माध्यमातून ज्ञानाची देवी माँ सरस्वतीची पूजा करण्यात आली तसेच शेकडो गरजू शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच शाळेची फी भरण्यासाठी काही विद्यार्थ्यांना आर्थिक मदत ही करण्यात आली.

या उपक्रमाबाबत मिथिलाजन ट्रस्टचे अध्यक्ष संजीव मिश्रा यांनी सांगितले की, मुले ही आपल्या देशाचे भविष्य आहेत आणि देशाचे भविष्य उज्ज्वल करणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. याच उद्देशाने दरवर्षी ट्रस्टकडून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात येते. या धार्मिक सोहळयाच्या यशस्वी आयोजनासाठी शिवसेनेचे नगरसेवक मल्लेश शेट्टी, सुमित झा, दीपक मिश्रा, केशरी पांडेय, आनंद झा आदींचे मोलाचे योगदान लाभले.

# आर्य गुरुकुलचा समष्टी अंजनेय होम
## चिन्मय मिशनच्या 75 व्या पवित्र अमृत महोत्सवाचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण येथील आर्य गुरुकुल, जागतिक चिन्मय मिशनच्या ७५ व्या अमृत महोत्सवाचा एक तेजस्वी भाग बनले. त्यांनी समष्टी अंजनेय होमचे आयोजन शनिवारी कल्याण मध्ये केले होते. हा एक असा यज्ञ होता ज्याने भक्ती, शिस्त आणि दैवी कृपेला एकत्र आणले. हा कार्यक्रम केवळ एक विधी नव्हता, तर एक आध्यात्मिक जागरण होते, जे वेदांताला दैनंदिन जीवनात आणि ज्ञानाला सेवेत रूपांतरित करण्याच्या गुरुदेवांच्या दृष्टिकोनाचा प्रतिध्वनी होता.

दिवसाची सुरुवात राम नामावलीच्या जपाने आणि तानपुऱ्याच्या श्रुतीने झाली, ज्यामुळे संपूर्ण परिसरात शांतता पसरली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने या कार्याचा प्रारंभ झाला. या कार्यक्रमाची सुरुवात भावपूर्ण भजनांनी, कृशांक मलिक (उपाध्यक्ष, चिन्मय मिशन, कल्याण) यांच्या स्वागतपर भाषणाने आणि अलका मुतालिक यांच्या सत्काराने झाली, ज्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला शोभा आणि प्रेरणा मिळाली. त्यांच्या शब्दांनी सर्वांना आठवण करून दिली की, “अमृत महोत्सवातील आर्य गुरुकुलचा सहभाग हा तरुण पिढीसाठी आध्यात्मिक जागृतीचा एक प्रकाशस्तंभ आहे.” याठिकाणी सर्वांच्या सहभागातून सामूहिक भक्तीचे दर्शन घडले. यामध्ये ४०० तरुण साधक, ७५ मार्गदर्शक, ५० समर्पित समर्थक, २१ कुटुंबे कृतज्ञता व्यक्त करणारी आणि २१ वैदिक विद्वान यांचा समावेश होता.



दिवसाचे एक प्रमुख आकर्षण म्हणजे 'राम-की टोळी' मिरवणूक होती, जिथे भगवान राम, सीता, लक्ष्मण आणि हनुमान यांचे आदरपूर्वक प्रतिनिधित्व करण्यात आले. एका प्रतीकात्मक कृतीत, हनुमानाने आपली गदा अम्माजींना अर्पण केली, ज्यामुळे प्रधान होमाचा प्रारंभ झाला. या पवित्र कृतीत नम्रता, भक्ती आणि सामर्थ्य यांचा संगम होता, ज्यामुळे यज्ञाच्या गहन आध्यात्मिक महत्त्वासाठी योग्य वातावरण निर्माण झाले. स्वामिनी निष्कलानंद-जी अम्मा यांचे आशीर्वादवचन या सोहळयाचा आत्मा होता.

**हा कार्यक्रम म्हणजे “अनिश्चिततेने भरलेल्या जगात, आपण जागतिक शांततेसाठी जप करूया, आणि 'वसुधैव कुटुंबकम' या भावनेचा स्वीकार करूया— ज्याचा अर्थ संपूर्ण जग एक कुटुंब असल्याची प्रतिक्रिया आर्य ग्लोबल अध्यक्ष भरत मलिक यांनी दिली. तर “शिक्षण हीच पूजा आहे. आजचा यज्ञ बुद्धी, हृदय आणि हात यांना एकत्र आणतो—जे सर्वांगीण शिक्षणाचे सार असल्याचे डॉ. नीलम मलिक यांनी सांगितले.**

## भविष्यवेध



■ सोमवार
26 जानेवारी 2026

**मेष**
स्थैर्य लाभेल. गुंतवणुकीसाठी दिवस अनुकूल नाही. संयम ठेवल्यास नातेसंबंध सुधारतील. कामानिमित्त प्रवास संभवतो. बोलण्यातून गैरसमज टाळा. मित्रांचे सहकार्य लाभदायक ठरेल.

**वृषभ**
घरगुती प्रश्नांवर लक्ष द्यावे लागेल. खर्च वाढू शकतो. मानसिक शांतता राखणे आवश्यक. नेतृत्वगुणांना वाव मिळेल. अडकलेली कामे पूर्ण होतील. अहंकार टाळल्यास लाभ होईल.

**मिथुन**
कार्यक्षेत्रात बदल संभवतो. आरोग्याची काळजी घ्या. मेहनतीचे योग्य फळ मिळेल. भागीदारीत सावधगिरी ठेवा. कायदेशीर बाबींमध्ये यश मिळू शकते. कौटुंबिक आनंद वाढेल. कामाचा

**कर्क**
ताण वाढेल. जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतील. संयम ठेवल्यास यश मिळेल. सर्जनशील कामात यश मिळेल. मित्रांचे सहकार्य लाभेल. खर्चावर नियंत्रण आवश्यक आहे.

**सिंह**
जुनी रखडलेली कामे मार्गी लागतील. नवे संपर्क लाभदायक ठरतील. प्रवासाचे योग आहेत. आरोग्याकडे लक्ष द्या. बोलण्यात संयम ठेवा. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील.

**कन्या**
निर्णय घेताना भावनांवर नियंत्रण ठेवा. कामाच्या ठिकाणी प्रशंसा मिळेल. आत्मविश्वास वाढेल. महत्त्वाची कामे पूर्ण होतील. खर्च वाढण्याची शक्यता. वाद टाळल्यास दिवस चांगला जाईल.

**तुळ**
आज कामात गती येईल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवा. कौटुंबिक वातावरण समाधानकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधगिरी आवश्यक. संयम ठेवल्यास यश मिळेल.

**वृश्चिक**
कामात अडथळे येऊ शकतात. संयम आणि मेहनतीने परिस्थिती सुधारेल. आरोग्याची काळजी घ्या. भागीदारीत लाभ संभवतो. सामाजिक सन्मान मिळेल. आर्थिक निर्णय विचारपूर्वक घ्या.

**धनु**
भावनिक निर्णय टाळा. आर्थिक स्थिती सुधारेल. कौटुंबिक सौख्य मिळेल. नवीन जबाबदाऱ्या मिळतील. कामात यश मिळेल. आर्थिक व्यवहारात सावध राहा. कुटुंबाकडून पाठिंबा मिळेल.

**मकर**
गुप्त शत्रूंपासून सावध रहा. आर्थिक निर्णय पुढे ढकला. संयम फायदेशीर ठरेल. शिक्षण व करिअरमध्ये प्रगती होईल. नवीन ओळखी उपयोगी पडतील. दिवस उत्साहवर्धक आहे.

**कुंभ**
कामाचा ताण जाणवेल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक स्थैर्य हळूहळू वाढेल. नवीन कल्पनांना यश मिळेल. सामाजिक कार्यात सहभाग वाढेल. खर्चाचे नियोजन करा. भावनिक स्थैर्य आवश्यक.

**मिन**
कौटुंबिक आनंद मिळेल. मन अस्वस्थ राहू शकते. महत्त्वाचे निर्णय पुढे ढकला. नातेवाईकांकडून सहकार्य मिळेल. नवीन संधी मिळण्याची शक्यता. प्रवास यशस्वी ठरेल. आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T. | B.Sc. CHEMISTRY MATHS | B.A.F. | BAMMC | B.Com. | B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT | M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390






# भिवंडी महापालिकेच्या महापौर व उपमहापौर पदांसाठी मोर्चेबांधणी सुरू

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**भिवंडी :** भिवंडी शहर महापालिकेत महापौर व उपमहापौर पद आणि सत्ता स्थापन करण्यासाठी भारतीय जनता पक्षाने हालचाली सुरू करताच सावध झालेले भिवंडी समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी पुढाकार घेत काँग्रेस,समाजवादी पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस या तीन पक्षाच्या स्थानिक अध्यक्ष पुढाऱ्यांना एकत्र घेऊन सेक्युलर फ्रंट आघाडीची स्थापणा करून व्युहरचना सुरू केली आहे.त्यामुळे आता भिवंडी महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी व महापौर पद मिळवण्यासाठी दोन्ही पक्षात जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे.विविध पक्षाचे काही नगरसेवक हे अज्ञातस्थळावरून पुन्हा शहरात परतले असुन ते काही गडबड करू नये यासाठी पक्षाचे अध्यक्ष लक्ष ठेवून आहेत. अनेकांना उपमहापौर पद,स्थायी समिती सभापती व सभागृह नेते पदा बाबतीत अमिष दाखवून खिळवून ठेवण्याचा प्रकार होत आहे त्यामुळे नगरसेवक सुध्दा व्दिधास्थितीत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.निवडणुकी नंतर भिवंडीत झालेल्या हाणामारी व दगडफेक प्रकारा नंतर पोलीस यंत्रणा सुध्दा सतर्क झाली असुन


**तारीक मोमीन (काँग्रेस)**


**सुमित पाटील (भाजप)**


**नारायण चौधरी (भाजप)**


**ॲड.मयुरेश पाटील (कोनार्क विकास आघाडी)**


**प्रतिभा पाटील (कोनार्क विकास आघाडी)**

महापौर निवडणूकीच्या हालचाली वर लक्ष ठेऊन आहेत.

भिवंडी महापालिकेत सेक्युलर फ्रंट आघाडीची सत्ता स्थापन करून महापौर व उपमहापौर विराजमान करण्यासाठी समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी काँग्रेस पक्षाचे शहरध्यक्ष रशिद ताहिर मोमीन,शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शोएब खान,समाजवादी पक्षाचे नेते अजय यादव व इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधून बैठक घेऊन चर्चा करून हालचाली सुरू केल्या आहेत. त्यामुळे भारतीय जनता पक्षाचे पदाधिकाऱ्यांनी सुध्दा हालचाली सुरू केल्या असुन नुकतीच पक्ष कार्यालयात विशेष बैठक घेऊन महापौर पदासाठी भाजपचे माजी सभागृह नेते सुमित पाटील व जेष्ठ नगरसेवक नारायण चौधरी यांच्या नांवाची शिफारस करून भाजपाचे प्रदेश कार्यालय येथे पाठविण्यात आली आहे. त्यामुळे आता भाजप पक्षाचेवतीने सत्ता स्थापन करण्यासाठी व महापौर पद मिळवण्यासाठी मोर्चा बांधणी सुरू केली असुन कोनार्क विकास आघाडी, भिवंडी विकास आघाडी,अपक्ष नगरसेवक व शिवसेना पक्षाच्या नगरसेवकाशी संपर्क सुरू केला आहे.

भाजप पक्षाचे नगरसेवकांनी सुध्दा कोकण भवन येथे जाऊन अधिकृतपणे आपल्या पक्षाचे स्वतंत्रपणे संख्या बळ नोंदणी करून सत्ता स्थापन करण्यासाठी धावपळ व व्युहरचना सुरू केली आहे.भाजपाने महापालिका निवडणुकीत शिवसेनेशी युती न करता स्वतंत्रपणे उमेदवार उभे करून २२ नगरसेवक निवडून आणले आहेत. तर शिवसेना पक्षाचे 12 नगरसेवक निवडून आले आहेत त्यामुळे आता हे दोन्ही पक्ष एकत्र येऊन महायुतीच्या माध्यमातून सत्ता स्थापन करण्यासाठी मोर्चा बांधणी करू लागले आहेत.

या दोन्ही पक्षांचे संख्याबळ 34 झाले आहे बहुमतासाठी 47 नगरसेवकांची आवश्यकता आहे त्यामुळे कोनार्क विकास आघाडी,भिवंडी विकास आघाडी व अपक्ष नगरसेवकांना सोबत घेऊन तसेच इतर पक्षातील काही नगरसेवकांना फोडाफोडी करून सोबत घेऊन महापौरपद मिळवून सत्ता स्थापन करण्यासाठी तयारी सुरू झाली आहे.महापालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने सुध्दा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत आघाडी न करता स्वतंत्रपणे निवडणूक लढवून 30 जागा मिळवल्या आहेत तर शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने 12 व समाजवादी पक्षाने अवघ्या 6 जागा मिळवल्या आहेत. त्यामुळे कोणत्याही पक्षाला बहुमत महापालिकेत मिळालेले नाही. त्यामुळे आता अपक्ष व आघाडी नगरसेवक व नगरसेवकांची फोडाफोडी करूनच सत्ता स्थापन करावी लागणार आहे. त्यामुळे काँग्रेस व भाजपात जोरदार चुरस निर्माण झाली आहे.

काँग्रेस पक्षा कडून तारीक मोमीन,शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून इशा इमरान खान, तर भाजपा कडून माजी सभागृह नेते सुमीत पाटील,माजी जेष्ठ नगरसेवक नारायण चौधरी, या नगरसेवकांची नांवे चर्चेत व आघाडीवर आहेत. कोणार्क विकास आघाडी तर्फे माजी महापौर प्रतिभा विलास पाटील,ॲड.मयुरेश पाटील यांची नांवे आघाडीवर आहेत.

सर्व पक्षाच्या नगरसेवकाचे नावाची नोंदणी व गटनेते पदाचे नांवे रजिस्टर करीत तेथून काही नगरसेवक मुंबई तर काही नगरसेवक स्वतंत्रपणे थंड हवेचे अज्ञातस्थळी रवाना झाले आहेत. सध्या महापालिकेत कोणालाही स्पष्ट बहुमत प्राप्त झालेले नाही. त्यामुळे सत्ता स्थापनेसाठी त्रिशंकू अवस्था निर्माण झाली आहे.

# कल्याण दुर्गाडी चौकात वाहतूक पोलिसावर तरुणांचा हल्ला

## चार जणांविरोधात गुन्हा दाखल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**कल्याण :** कल्याणमधील दुर्गाडी चौक परिसरात कर्तव्यावर असलेल्या वाहतूक पोलिस कर्मचारी विलास भागीत यांच्यावर चार तरुणांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. रॉंग साईडने वाहन चालवत असल्याचा जाब विचारल्याने संतापलेल्या तरुणांनी पोलिस कर्मचाऱ्यावर थेट हल्ला केल्याचे समोर आले आहे.



या मारहाणीत विलास भागीत गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेनंतर बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची दोन पथके रवाना करण्यात आली आहेत. दरम्यान, मारहाण करणारे तरुण हे शिवसेना (शिंदे गट) मधील एका नगरसेवकाचे समर्थक असल्याची माहिती समोर येत असून, कर्तव्यावर असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यावर झालेल्या या हल्ल्यामुळे शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका
## महापालिका सचिव कार्यालय

**महापालिका सचिव कार्यालय**
**दिनांक :- २५/०१/२०२६**

**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना**
**सभा क्रमांक : ०१, दिनांक २५/०१/२०२६**

**प्रति,**
**मा. सदस्य/सदस्या,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.**
**महोदय/महोदया,**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मंगळवार, **दिनांक ०३/०२/२०२६** रोजी, दुपारी १२.०० वाजता, महापालिका भवन, चौथा मजला, शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम) येथील 'स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर सभागृहात' मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी सदर सभेसाठी नियुक्त केलेल्या पीठासीन अधिकारी श्रीमती आंचल गोयल, मा. जिल्हाधिकारी (मुंबई शहर) यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यांत आली आहे.

**सभा क्रमांक ०१, दिनांक ०३/०२/२०२६ ची विषय पत्रिका**

**विषय क्रमांक**

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९ महापौर व उप महापौर यामधील पोटकलम (१) अन्वये, महापालिका सदस्यांपैकी एका सदस्याची कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या "महापौर" पदासाठी अडीच वर्षे पदावधीकरितां निवड करणे.
२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९ महापौर व उप महापौर यामधील पोटकलम (१) अन्वये, महापालिका सदस्यांपैकी एका सदस्याची कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या "उपमहापौर" पदासाठी अडीच वर्षे पदावधीकरितां निवड करणे.

तरी सदर सभेस कृपया उपस्थित रहावे, ही विनंती.

**सही**
**(किशोर शेळके)**
**महापालिका सचिव,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका.**

**(मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे दिनांक २३/०१/२०२६ रोजीचे आदेशानुसार)**

**महापालिका सचिव कार्यालय**
**महापालिका भवन, पहिला मजला,**
**शंकरराव चौक, कल्याण (प.)**
**दिनांक: २५/०१/२०२६**
**सोबत : निवडणूक कार्यक्रम**

---

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**मंगळवार, दिनांक ०३/०२/२०२६ रोजी होणाऱ्या "महापौर व उपमहापौर" या पदासाठीचा निवडणूक कार्यक्रम**

| तारीख | तपशील |
|---|---|
| **गुरुवार, दि. २९/०१/२०२६ ते शुक्रवार, दि. ३०/०१/२०२६** | महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूक लढविण्याची इच्छा असलेला कोणताही पालिका सदस्य विहीत नमुन्यातील आपले नामनिर्देशनपत्र महापालिका सचिवांकडे त्यांचे कार्यालयात सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.३० या वेळेत जातीने सादर करील. |
| **दिनांक ०३/०२/२०२६ महापौर व उपमहापौर पदाचे निवडणूकीसाठी विशेष सभा दुपारी १२.०० वाजेपासून** | **प्रत्यक्ष सभेचे कामकाज सुरु झाल्यानंतर -**<br>१) महापौर पदासाठी महापालिका सचिवाला वरील दिवशी व वेळी प्राप्त झालेलीसर्व नामनिर्देशनपत्रे सभा सुरु झाल्यानंतर पीठासीन प्राधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यांत येतील.<br>२) पीठासीन अधिकारी प्राप्त झालेल्या सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी करील व वैधपणे नामनिर्देशीत केलेल्या सर्व उमेदवारांची नांवे वाचून दाखवील.<br>३) यथोचित रित्या नामनिर्देशीत केलेल्या पालिका सदस्यांची नांवे वाचून दाखविल्यानंतर १५ मिनीटांच्या आंत एखाद्या उमेदवारास त्याची उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्याने सही केलेली लेखी नोटीस पीठासीन अधिकारी यांचेकडे देऊन त्याला त्याची उमेदवारी मागे घेता येईल.<br>४) त्यानंतर महापौर पदाचे निवडीसाठी पीठासीन अधिकारी निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराचे नांव वर्णानुक्रमाने घोषीत करील आणि हात वर करुन मतांची नोंद घेईल. ज्यांनी त्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले असेल अशा पालिका सदस्यांची नांवे कार्यवृत्तात नोंदवतील. त्याशिवाय ज्यांनी कोणतेही मत दिले नाही, अशा सदस्यांची वेगळी नोंद घेईल. तद्नंतर, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास प्राप्त झालेल्या मतांची संख्या घोषीत करुन पीठासीन अधिकारी निवडणूकीचा निकाल घोषीत करतील.<br>**महापौर पदाचे निवडणुकीसाठीची प्रक्रिया संपवून महापौर पदाच्या निवडीचा निकाल जाहीर केल्यानंतर :-**<br>वरील अ.क्र.१ ते ४ नुसार उपमहापौर पदाच्या निवडीसाठीची प्रक्रिया करुन उपमहापौर पदाच्या निवडणूकीचा निकाल घोषित करतील. |

टीप - विहीत नमुन्यातील नामनिर्देशनपत्र व उमेदवारी मागे घेण्याचा विहीत नमुन्यातील अर्ज महापालिका सचिव कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळी उपलब्ध आहे.

**महापालिका सचिव कार्यालय**
**महापालिका भवन, पहिला मजला,**
**शंकरराव चौक, कल्याण (प.)**
**दिनांक: २५/०१/२०२६**

**सही**
**(किशोर शेळके)**
**महापालिका सचिव,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका.**

# "शाहू सावंत प्रतिष्ठान"तर्फे माघी गणेशोत्सवाचं आयोजन

## सांस्कृतिक कार्यक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**डोंबिवली पश्चिम :** डोंबिवली पश्चिमेतील कैलासनगर परिसरात "शाहू सावंत प्रतिष्ठान"तर्फे माघी सार्वजनिक गणेशोत्सव गेल्या अनेक वर्षांपासून भक्तिभावात साजरा करण्यात येत आहे. या माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने यंदा महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ तसेच बाळगोपाळांसाठी विविध स्पर्धात्मक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या उत्सवात प्रभागातील सर्व नागरिकांनी महागणपतीचे दर्शन घेतले असून कार्यक्रमांना मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावली होती. महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, तर



लहान मुलांसाठी नृत्य स्पर्धांसह विविध उपक्रम राबविण्यात आले. बाळगोपाळांनी या कार्यक्रमांचा मनमुराद आनंद लुटला, तर महिलांनी एकमेकींना हळदीकुंकू लावून वाण लुटत हा सण आनंदात साजरा केला.

दरम्यान या कार्यक्रमास नवनिर्वाचित नगरसेवक, भाजपचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी "शाहू सावंत प्रतिष्ठान"च्या सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे कौतुक केले.

# मातृभाषेतुन शिक्षण देणा-या शाळा वाचण्यासाठी क्रांतिज्योती विद्यालय सिनेमा करमुक्त करावा - शिक्षण क्रांती संघटनेची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या उद्दिष्टांनुसार अभ्यासक्रमातील अवघड संकल्पना लवकर समजण्यासाठी प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतुन किंवा स्थानिक समुदायात बोलल्या जाणा-या भाषेतुन होणे गरजेचे आहे. सध्या गाजत असलेला क्रांतिज्योती विद्यालय हा चित्रपट देखील हाच संदेश देत आहे. यासाठी हा सिनेमा अधिकाधीक घरांपर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. हा चित्रपट करमुक्त केल्यास जास्तीत जास्त लोकांपर्यंत तो पोहोचेल व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत होईल. याबाबतचे निवेदन शिक्षण क्रांती संघटनेच्या वतीने ठाणे जिल्हाधिका-यांच्या मार्फत सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांना देण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी संदिप माने, क्रांतिज्योती विद्यालयाचे दिग्दर्शक हेमंत ढोमे,निर्माती क्षिती जोग, अभिनेते अमेय वाघ, हरेश दुधाळे, शिक्षण क्रांती संघटनेचे राज्याध्यक्ष सुधीर घागस, कोकण विभाग कार्यवाह ज्ञानेश्वर गोसावी, उल्हासनगर महानगर अध्यक्ष राजेंद्र गवळी, ठाणे महानगर अध्यक्ष किशोर राठोड हे उपस्थित होते.

मातृभाषेतुन शिक्षण घेणा-या मुलांना शैक्षणिक संकल्पना दृढ झालेल्या असतात त्यामुळे उच्च शिक्षण घेताना त्यांना अध्ययनात अडचणी येत नाही व पुढील शिक्षण सहज होते. परंतु इंग्रजी माध्यमामध्ये शिक्षण घेतल्यास मुलं हुषार होतात असा गैरसमज पालकांच्या मनात झालेला आहे. क्रांतिज्योती विद्यालय चित्रपट पाहिल्यास हा गैरसमज दुर होऊन मातृभाषेतील शिक्षणाचे महत्व पालकांच्या लक्षात येईल असा विश्वास सुधीर घागस यांनी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याजवळ व्यक्त केला. चित्रपट करमुक्त करण्यासाठी शासनाकडे शिफारस करणार असल्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पाचांळ यांनी चित्रपटाची टीम व शिक्षण क्रांती संघटनेचे पदाधिकारी यांना सांगितले.

# केडीएमसीत राजकीय समीकरणे बदलली शिवसेना (ठाकरे गट) विरोधी बाकावर बसणार !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

कल्याण-डोंबिवली : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणूक निकालानंतर शहरातील राजकीय चित्र झपाट्याने बदलले आहे. या निवडणुकीत शिंदेसेना आणि भाजपने एकत्र युतीत निवडणूक लढवली होती. मात्र निकालानंतर महापौरपदावरून या दोन्ही पक्षांमध्ये मतभेद निर्माण झाल्याने शिंदेसेनेने मनसेसोबत जाण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानुसार मनसेनेही शिंदेसेनेला पाठिंबा दिला आहे.

दरम्यान, निवडणुकीपूर्वी मनसे आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) यांनी एकत्र लढत दिली होती. मात्र सध्याच्या बदलत्या राजकीय घडामोडींमध्ये ठाकरे गटाची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर या संदर्भात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट झाली असून केडीएमसीत हा पक्ष विरोधी बाकांवर बसणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

याबाबत आमदार वरुण सरदेसाई यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या नगरसेवकांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. सध्या केडीएमसीमध्ये मोठ्या प्रमाणावर घोडेबाजार सुरू असून विविध आघाड्या व युती तयार होत आहेत. या पार्श्वभूमीवर नगरसेवकांनी उद्धव ठाकरे यांच्याकडून मार्गदर्शन घेतले.

"उद्धव ठाकरे यांनी सर्व नगरसेवकांना स्पष्ट मार्गदर्शन केले असून पक्षाने घेतलेला निर्णय आम्हाला मान्य आहे," असेही सरदेसाई यांनी सांगितले. त्यामुळे केडीएमसीत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाची भूमिका आता ठामपणे विरोधी पक्ष म्हणून राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## पालघर जिल्ह्यातील वारली संगीतकार
# भिकल्या धिंडा यांना पद्म पुरस्कार

केंद्र सरकारकडून वारली संगीत क्षेत्रातील पद्म पुरस्कार जाहीर झाला असून पालघरमधील वारली संगीतकार भिकल्या लाडक्या धिंडा यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. पालघर जिल्ह्यातील जव्हारसारख्या अतिदुर्गम तालुक्यातील वाळवंडा येथील वारली संगीतकार तारपा वादक भिकल्या धिंडा यांनी पद्म पुरस्कार जाहीर झाल्यानंतर तारपा वाजवत आनंद व्यक्त केला. पालघर जिल्ह्यातील जव्हारसारख्या अतिदुर्गम तालुक्यातील वाळवंडा येथील वारली संगीतकार तारपा वादक भिकल्या धिंडा यांनी पद्म पुरस्कार जाहीर झाल्यानंतर तारपा वाजवत आनंद व्यक्त केला.





ठाणे ■ सोमवार
26 जानेवारी 2026
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# १११९ फूट तिरंगा यात्रेतून राष्ट्रभक्तीचा जागर, अभाविपचा उपक्रम



**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

नवी मुंबई : प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर युवकांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक जबाबदारीची भावना अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), नवी मुंबई यांच्या वतीने आज, शुक्रवारी ११११ फूट भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. युवक सप्ताह आणि नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या यात्रेत नवी मुंबई परिसरातील हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

यात्रेचा प्रारंभ वाशी येथील ब्ल्यू डायमंड चौक येथून झाला. हातात तिरंगा ध्वज, अंगावर राष्ट्रभक्तीचा अभिमान आणि ओठांवर "भारत माता की जय", "वंदे मातरम्", "जय हिंद" अशा घोषणांसह विद्यार्थ्यांनी मार्गक्रमण केले. ही यात्रा सेक्टर १०ए, वाशी येथील साईनाथ एज्युकेशन ट्रस्टच्या राजीव गांधी कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स येथे पोहोचून संपन्न झाली. संपूर्ण परिसर राष्ट्रभक्तीच्या घोषणांनी आणि उत्साहाने भारावून गेला होता.

# सोनसाखळी चोर जेरबंद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण (प्रतिनिधी)**

पेण तालुक्यातील वडखळ पोलिस स्टेशनपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या उपकार हॉटेलजवळ साखळी चोरीची घटना घडली. मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी एका महिलेच्या गळ्यातील सुमारे १ लाख ३५ हजार रुपयांची सोन्याची साखळी हिसकावून नेली. सुलोचना रमेश भालेराव (वय ४२, रा. मातोश्री एसटी स्टँड परिसर, पेण) सकाळी कामावर जाण्यासाठी हॉटेलपासून गोवा रोडकडे एकट्याच पायी जात होत्या, तेव्हा मोटार सायकलवरून आलेल्या दोघांनी त्यांना लक्ष्य केले. मागे बसलेल्या व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाची साखळी हिसकावून नेली.

तपासादरम्यान चिपळूण पोलिसांच्या सहकार्याने आतिफ मोबिन अन्सारी (रा. मालवणी झोपडपट्टी, मालाड पश्चिम, मुंबई) याला अटक करण्यात आली आहे. मात्र त्याचा साथीदार अद्याप फरार असून शोध सुरू आहे. आरोपीवर यापूर्वी तब्बल ४६ गुन्हे दाखल असून त्याने दहा वर्षांची शिक्षा भोगली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

अटक केलेल्या आरोपीला न्यायालयात हजर केले असता, ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. ही कारवाई पोलिस निरीक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक चव्हाण करत असून, वडखळ पोलिसांच्या तत्पर कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# दुष्मी येथील घरफोडीचा उलगडा

## पेण पोलिसांकडून तिघांना अटक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण (प्रतिनिधी)**

पेण पोलीस ठाणे हद्दीतील दुष्मी (ता. पेण) गावात घडलेल्या घरफोडी व चोरीच्या गुन्ह्याचा उलगडा करत पेण पोलिसांनी तिघा आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत सुमारे १ लाख ८१ हजार रुपये किमतीचा सोन्याचा ऐवज व रोख रक्कम हस्तगत करण्यात आली असून मुख्य आरोपीसह दोन साथीदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

प्राप्त महितीनुसार, १७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० ते ४.०० या वेळेत फिर्यादी केतन अशोक दिवेकर (वय २५, रा. दुष्मी, ता. पेण) हे घराला कुलूप लावून क्रिकेट सामना पाहायला गेले असताना अज्ञात आरोपींनी मुख्य दरवाजाचे कुलूप फोडून घरात प्रवेश केला. घरातील किचनमध्ये ठेवलेली रोख रक्कम, सोन्याच्या वस्तू तसेच बेडरूममधील रोख रक्कम असा एकूण २ लाख ५४ हजार रुपयांचा ऐवज चोरून आरोपी पळून गेले. या प्रकरणी फिर्यादींच्या तक्रारीवरून पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान घटनास्थळ रोडपासून अवघ्या १०० मीटर अंतरावर असल्याने आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी संकेत मधुकर ठाकूर (रा. दुष्मी) याला अटक केली. त्याच्याकडून सुमारे ४७ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या चैन व ३९ हजार रुपये रोख असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपासात गुड्डु हरेराम सिंग उर्फ रॉकी (रा. पनवेल) आणि जयेश हिरामण ठाकूर (रा. दुष्मी) या दोन साथीदारांना दि. २३जानेवारी २०२६ रोजी अटक करण्यात आली. यातील गुड्डु सिंग हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही गुन्हे दाखल आहेत. ही संपूर्ण कामगिरी पेण पोलिसांनी यशस्वीरीत्या बजावली आहे.

# जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणूक पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**
**रायगड-अलिबाग**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2026 च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी (दि.24 जानेवारी) रोजी कर्जत येथील उपविभागीय कार्यालयातील निवडणूक कार्यालयास भेट देऊन निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना तसेच सुरू असलेल्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर आढावा घेतला. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल,




उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, पोलीस उपअधीक्षक राहुल गायकवाड, तहसीलदार धनंजय जाधव, पोलीस निरीक्षक उमेश पाटील, गटविकास अधिकारी सुशांत पाटील आदी अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निकाल जाहीर होईपर्यंत आदर्श आचारसंहिता लागू राहणार असून सर्व मतदान केंद्रांवर मतदारांसाठी सुस्थितीत खोल्या, शौचालये, पिण्याचे पाणी, दिव्यांगांसाठी रॅम्प आदी मूलभूत सुविधा उपलब्धता याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी श्री.जावळे यांनी स्ट्राँग रूम व निवडणूक साहित्य कक्षाचीही तपासणी केली. तसेच स्वीप कार्यक्रमांतर्गत प्रभावी जनजागृती राबवून जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने प्रयत्न करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

# वसई विरार परिवहन सेवेच्या चालत्या बसचे चाक निखळले !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**विरार :** विरार पूर्व भागात शनिवारी रात्री सुमारे ९ वाजता वसई–विरार महापालिकेच्या परिवहन सेवेच्या चालत्या बसचे पुढील चाक अचानक निखळल्याची घटना घडली. चाक निखळल्याचे लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान राखत बस तात्काळ थांबवली व सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवण्यात आले.

ही बस विरार पूर्वेकडील गावडवाडी परिसराकडे प्रवाशांना घेऊन जात असताना ही घटना घडली. बसची गती कमी असल्याने मोठा अनर्थ टळला.

मात्र या घटनेमुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनेचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत असून, पालिकेच्या परिवहन सेवेतील जुन्या व खिळखिळ्या बसेसबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित होत आहेत

या घटनेमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, परिवहन विभागाने बसांची तातडीने तांत्रिक तपासणी करून देखभाल व्यवस्थेत सुधारणा करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सातत्याने घडणाऱ्या अशा घटनांकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात असून, वेळेवर देखभाल व तपासणी झाली असती तर हा प्रकार टाळता आला असता, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

# धर्मवीर आनंद दिघे उद्यानाला सांडपाण्याचा विळखा दुर्गंधीने बालगोपाळ व ज्येष्ठ नागरिक त्रस्त

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**कल्याण :** २७ जानेवारी रोजी धर्मवीर आनंद दिघे यांची जयंती असते. या दिवशी शिवसैनिक, नेतेमंडळी तसेच त्यांच्यावर प्रेम करणारे असंख्य नागरिक मोठ्या उत्साहात जयंती साजरी करतात. मात्र त्यांच्या नावाने असलेल्या उद्यानांकडे आवश्यक तेवढे लक्ष दिले जात नसल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

डोंबिवली एमआयडीसी निवासी परिसरातील मॉडेल स्कूलजवळ असलेले धर्मवीर आनंद दिघे उद्यान २००२ साली तत्कालीन नगरसेवक भालचंद्र म्हात्रे यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आले होते. या उद्यानाचे दोन वेळा सुशोभीकरण खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि माजी आमदार राजू पाटील यांच्या निधीतून करण्यात आले होते. मात्र



सध्या उद्यानाच्या शेजारी सुरू असलेल्या एमआयडीसी अंतर्गत ठेकेदाराच्या कामामुळे उद्यानाची अवस्था दयनीय झाली आहे.

सध्या या परिसरात पावसाळी गटाराचे काम सुरू असून ठेकेदाराकडून गटारे अर्धवट अवस्थेत ठेवण्यात आली आहेत. काम करताना येथील सांडपाणी वाहिन्या फुटल्याने ड्रेनेजचे सांडपाणी पावसाळी गटारात साचले आहे. त्यामुळे या सांडपाण्यात डासांची अंडी व पैदास मोठ्या प्रमाणावर होत असून परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. याचा थेट फटका उद्यानात येणाऱ्या बालगोपाळ, ज्येष्ठ नागरिक आणि मॉर्निंग वॉक करणाऱ्यांना बसत आहे.

ठेकेदाराने काम अर्धवट सोडल्यामुळे उद्यानातील सुरक्षारक्षकही अनेकदा अनुपस्थित राहत असल्याचे नागरिक सांगतात. परिणामी झाडांना पाणी दिले जात नाही तसेच उद्यानातील स्वच्छताही होत नाही. सुरक्षारक्षक नसल्याने संध्याकाळच्या वेळेत उद्यानात गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारीही स्थानिकांकडून केल्या जात आहेत.

महापालिका निवडणुकीपूर्वी येथील शिवसेनेचे इच्छुक उमेदवार अभिषेक चौधरी यांनी उद्यानाची साफसफाई तसेच खेळणी दुरुस्त करून घेतली होती. मात्र त्यानंतर ठेकेदाराच्या निष्काळजी कामामुळे आणि देखरेखीअभावी उद्यान पुन्हा दुर्लक्षित अवस्थेत गेले आहे.

या गंभीर प्रकाराबाबत स्थानिक रहिवासी तसेच शिवसेना (उबाठा) शाखाप्रमुख सागर पाटील, माजी नगरसेवक भालचंद्र म्हात्रे, राजू नलावडे, मंदार स्वर्गे यांनी एमआयडीसी संबंधित ठेकेदार आणि प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई झालेली नाही. धर्मवीर आनंद दिघे यांची जयंती मोठ्या प्रमाणावर साजरी होत असताना, किमान या जयंतीपूर्वी तरी एमआयडीसी ठेकेदाराने निष्काळजीपणा थांबवून सांडपाणी प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अन्यथा नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होऊ शकतो, अशी चिंता परिसरातील नागरिक व्यक्त करत आहेत.

# महापे येथील कंपनीला भीषण आग

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

नवी मुंबई : महापे एमआयडीसी परिसरात शनिवारी दुपारी सुमारे १२:३० वाजताच्या सुमारास एका केमिकल कंपनीला भीषण आग लागल्याची घटना घडली होती. बिटाकेम असे या कंपनीचे नाव असून, अचानक आग भडकल्याने संपूर्ण औद्योगिक परिसरात खळबळ उडाली होती. महापे एमआयडीसीतील 'ए-३६' समोरील पावणे एमआयडीसी भागात, डब्ल्यू-१७७ क्रमांकाच्या प्लॉटवर बिटाकेम ही केमिकल कंपनी असून आगीमुळे कंपनीच्या आवारातून मोठ्या प्रमाणात काळ्या धुराचे लोट उसळले होते. हे धुराचे लोट दूरवर पसरल्याने परिसरातील कामगार तसेच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# पेण : प्रायव्हेट हायस्कूल व कन्याशाळेत चोरट्याने मारला डल्ला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण प्रतिनिधी**

पेण नगरपालिके पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्रायव्हेट हायस्कूल आणि सौ. म. ना. नेने कन्या विद्यालयात अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारल्याने जनतेत असुरक्षितता निर्माण झाली असून, वाढत्या चोरीच्या घटनांमुळे भीतीचे वातावरण पसरले आहे

दि.२४ जानेवारी २०२६ रोजी रात्री १.३० ते ३.३० वाजण्याच्या सुमारास अज्ञात इसमांनी प्रायव्हेट हायस्कूल, पेण येथे प्रवेश करून कार्यालयातील कपाटे फोडली व सर्व साहित्य अस्ताव्यस्त केले. या शाळेतून रोख रक्कम रुपये १२,१७३/- चोरीस गेली असून कार्यालयातील साहित्य मात्र अस्ताव्यस्त करण्यात आले आहे. यानंतर चोरट्यांनी सौ. म.ना. नेने कन्या विद्यालयात प्रवेश करून कार्यालयातील कपाटे व मुख्याध्यापकांच्या केबिनमधील कपाटे फोडली. त्यातील साहित्य अस्ताव्यस्त करून रुपये १७,८४५ रोख रक्कम चोरून नेण्यात आली. तसेच सुमारे ५० मीटर लांबीची साउंड सिस्टीमची वायर बंडलही चोरीस गेली आहे. दोन्ही शाळांमधून मिळून एकूण ३० हजार १८ रूपये रोख रक्कम चोरीला गेली आहे. सदर गुन्ह्याचा तपास पेण पोलीस करीत असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व इतर पुराव्यांच्या आधारे चोरट्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, या घटनेतील आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# मिरा-भाईंदरची महापौर निवड ३ फेब्रुवारीला

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**भाईंदर / दि. २५**

मिरा भाईंदर महापौर पदासाठी येत्या ३ फेब्रुवारीला निवडणूक होणार आहे. मिरा भाईंदरचे महापौर पद सर्वसाधारण महिलांसाठी राखीव झाले आहे. ९५ पैकी भाजपकडे ७९ संख्याबळ असल्याने महापौर भाजपचाच होणार, हे निश्चित आहे. मात्र, कोणत्या महिला नागरसेविकेला मिळणार याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. महापौर निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार पीठासीन अधिकारी म्हणून उपस्थित रहाणार आहेत. दरम्यान महापालिका प्रशासनाकडून नवनिर्वाचित नगरसेवकांचे स्वागत करण्याची तयारी पूर्ण झाली आहे. महासभेच्या सभागृहाचे नूतनीकरण पूर्ण करण्यात आले आहे. महापौर, उपमहापौर त्याचप्रमाणे अन्य पदाधिकाऱ्यांची दालने सज्ज करण्यात येत आहेत. २०२२ मध्ये महापालिकेची मुदत संपुष्टात आल्यापासून सुमारे साडेतीन वर्षे ही दालने पदाधिकाऱ्यांची प्रतिक्षेत होती.

# मातृत्वाचा गौरव म्हणजे आईने दिलेल्या संस्कारांची शिदोरी - आमदार किसन कथोरे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**दिलिप पवार ■ मुरबाड**

आई ही केवळ कुटुंबाची आधारवड नसून संपूर्ण समाजाला दिशा देणारी जिवंत संस्कृती असते. त्याग, कर्तव्य, प्रेम आणि संस्कार यांचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या मातोश्री श्रीमती गुलाबबाई उर्फ जिजी सासे यांचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा रविवार, २५ जानेवारी २०२६ रोजी कुडवली (ता. मुरबाड) येथे अत्यंत भक्तिभाव, कृतज्ञता व भावनिक वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या मंगल सोहळ्याची सुरुवात सकाळी पारंपरिक सहस्त्रचंद्रदर्शन व तुला विधीने करण्यात आली. यानंतर दिव्यांग व अनाथ बालकांना भेटवस्तू देऊन सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. आईचे ममत्व केवळ कुटुंबापुरते मर्यादित नसून ते समाजापर्यंत पोहोचते, हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आला.

आमदार किसन कथोरे या सोहळयाला उपस्थित राहून मातृत्वाच्या महत्त्वावर अत्यंत भावस्पर्शी असे विचार मांडले. "आई ही नात्यांची पहिली शाळा असते. मुलगा, सून आणि नातवंडे यांच्यातील प्रेम, जिव्हाळा आणि सुसंवाद आईच घडवत असते. पिढ्यान्पिढ्या नाती टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य आईमध्येच असते. आईचा सन्मान म्हणजे संपूर्ण कुटुंबाच्या संस्कारांचा सन्मान आहे." यावेळी त्यांनी मातोश्री गुलाबबाई सासे यांचे चरणस्पर्श करून आशीर्वाद घेतले. 'आई' या विषयावर हृदयस्पर्शी



व्याख्यान प्रसिद्ध प्रवचनकार व शिवव्याख्याते प्रा. यशवंत गोसावी यांनी "आई" या विषयावर प्रेरणादायी व अंतर्मुख करणारे व्याख्यान दिले. आईच्या निःस्वार्थ त्यागाची, संस्कारक्षम भूमिकेची व जीवनातील अनन्यसाधारण स्थानाची प्रभावी मांडणी त्यांनी केली. त्यांच्या शब्दांनी उपस्थितांचे डोळे पाणावले.

या सोहळयास जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुभाष पवार,भाजपा तालुका अध्यक्ष जितेंद्र भावार्थे, खरेदी-विक्री संघाचे चेअरमन संतोष पवार,बाजार समितीचे संचालक सुरेश बांगर, ज्येष्ठ नेते रामभाऊ दळवी, युवा नेते अनिल घरत, नगरसेवक विनोद नार्वेकर, नगरसेविका मधुरा मोहन सासे, भाई तेलवणे, सदानंद मोरे काका, आरपीआय तालुकाध्यक्ष दिनेश उघडे, युवा नेते हरेश खापरे,बाजार समितीचे चेअरमन दीपक खोटेघरे, अण्णा साळवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक खरेदी-विक्री संघाचे संचालक रमाकांत सासे यांनी केली, तर संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन माजी नगराध्यक्ष मोहन सासे यांनी अत्यंत उत्कृष्टरीत्या पार पाडले. मुरबाड तालुक्यात प्रथमच अशा भव्य व संस्कारमय सहस्त्रचंद्रदर्शन तुला सोहळ्याचे आयोजन सासे बंधूंनी कुडवली येथे करून आदर्श निर्माण केला. या कार्यक्रमासाठी ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, कल्याण, शहापूर, भिवंडी, उल्हासनगर येथून नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खऱ्या अर्थाने हा सोहळा एका व्यक्तीचा गौरव नसून "आई" या संकल्पनेलाच वंदन करणारा संस्कारमय उत्सव ठरला, असे सर्वत्र बोलले जात आहे.

# भिवंडीत मध्ये सुंदरकांड पठण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी (प्रतिनिधी)**

अयोध्येतील भगवान श्रीरामलल्लांच्या भव्य मंदिराच्या उद्घाटनाच्या वर्धापन दिना निमित्त भिवंडीतील श्री सिद्धेश्वर योग मित्र मंडळाने अशोक नगर येथील श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरात सुंदरकांडाचे पठण आणि भजन संध्याकाळ आयोजित केली होती.योग गुरु आणि भजन गायक श्यामनाथ शर्मा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुंदरकांडाचे पठण आणि भजन सादर केले.भजन कार्यक्रम ऐकण्यासाठी परिसरातील महिलासह नागरिक भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. गेल्या वर्षापासून




अशोकनगर येथील श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरात दररोज सकाळी ६:४५ ते ७:४५ पर्यंत कोणत्याही सुट्टीशिवाय योग केला जातो आणि सामाजिक संदेश दिला जातो.या कार्यक्रमात मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होतात. सुंदरकांड व भजन संध्येचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योग मित्र मंडळाचे सदस्य बनवारीलाल केसरवाणी,शीतल प्रसाद मिश्रा,सुधीर देशमुख, घनश्याम केसरवाणी,रामनारायण सोनी, राजूभाई मौर्य, बळवंत वाणी,सुरेश गुप्ता,मिलिंद गुप्ता यांनी परिश्रम घेतले. दीपक रामचंदानी,प्रमोद अग्रवाल, संतोष गुप्ता यांच्यासह इतर सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले.या निमित्ताने महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024